पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका/११/कावि/ ७ /२०१५
दिनांक : ०९ / ०१/२०१५

प्रति,
मा. ---- ---------------- -
सदस्य/ सदस्या, अ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४११०४४

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची सभा
बुधवार दिनांक १४/०१/२०१५ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १४/०१/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील ' राजमाता जिजाऊ सभागृह ' येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक १०**

दिनांक १४/०१/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगर पालिका अ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १४/०१/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील 'राजमाता जिजाऊ सभागृह' येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १७/१२/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे डिसेंबर २०१४ चे मासिक सभेचा सभात्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ९) कायम करणे.

विषय क्र.१ **संदर्भ : मा. मोरेश्वर महादु भोंडवे यांचे दिनांक १७/१२/२०१४ रोजीचे पत्र**

प्रभाग क्रमांक १९ मधील वाल्हेकरवाडी परिसरामधील रस्त्यांचे नामकरणाबाबत.

१. सेलेस्टीयल सिटी मागे सर्व्हे नं. ७७ मधील रस्त्यास “संतोष दत्तात्रय भोंडवे मार्ग”
२. शिंदेवस्ती रावेत पासून डी मार्टकडे जाणा-या रस्त्यास “कै.चंद्रभागा महादु भोंडवे मार्ग”
३. शिंदेवस्ती MIDC रोड सोनटक्के वस्तीच्या कडेने उजव्या साईडला जाणाऱ्या रस्त्यास “कै.महादु हरी भोंडवे पथ”
४. वाल्हेकरवाडी भोंडवे वस्तीकडे जाणा-या रस्त्यास “कै.बबीबाई विनायक शिंदे मार्ग”

वरीलप्रमाणे नामकरण करणेबाबत विचार करणे.

**(टिप – माहे जानेवारी २०१५ चे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र. २ **संदर्भ : मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील प्रभूचेंबर्स सोसायटी ते श्री गणेश प्रसारक ट्रस्ट या पदपथास “कै.सौ.सुमन अविनाश काळभोर मार्ग” असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

**(टिप – माहे जानेवारी २०१५ चे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.३ **संदर्भ : मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील कृष्णा पार्क सोसायटी ते काळभोर निवास या पदपथास “कै.सावळेराम खंडूजी काळभोर पथ” असे नाव देणेबाबत विचार करणे.

**(टिप – माहे जानेवारी २०१५ चे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र. ४ संदर्भ : मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचे दिनांक २२/१२/२०१४ रोजीचे पत्र

आकुर्डी गावठाण परिसरात स्टॉर्मवॉटर लाईन टाकणेबाबत.

१. आकुर्डी गावठाण भैरवनाथ मंदिर ते आकुर्डी प्राधिकरण रोड (इंदिरा चौक) पर्यंत
२. विजय कॉलनी ते गुरुदेवनगर रोड
३. गंगानगरमध्ये शिसोदिया दुकान दत्तमंदिर ते कै.पांडूरंग काळभोर सभागृह व पांढरकर उद्यानापर्यंत.

वरील ठिकाणी स्टॉर्मवॉटर लाईन टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ५ **संदर्भ : मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचे दिनांक २२/१२/२०१४ रोजीचे पत्र**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणातील काही भागातील घरे ही ३० ते ४० वर्षे जुनी आहेत. तसेच दर ३ वर्षांनी रस्त्याचे डांबरीकरण केले जात असलेने रस्त्याची उंची वाढत आहे. घरे रस्त्यांपेक्षा दोन ते अडीच फुट खाली असल्याने पावसाळयात रस्त्यावरील पावसाचे पाणी नागरीकांच्या घरात /चाळीत शिरते. संपुर्ण पावसाळा याचा नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. या भागातील ड्रेनेज लाईन पाणी लाईन व पावसाळी गटर लाईनची उंची देखील चाळीतील व इतर काही घरांपेक्षा उंच असलेने घरातील पाणी मोरीद्वारे बाहेर जात नाही.

पावसाळ्यात नागरीकांच्या घरात पाणी शिरुन होणारा त्रास कमी करण्यासाठी सदरचे भागातील रस्त्याची उंची कमी करणे व ड्रेनेज लाईन तसेच पावसाळी गटर लाईनची उंची कमी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ ७ /२०१५
दिनांक : ०९ /०१/२०१५